# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) द्वारा संचलित श्री राम विजाभज प्राथमिक आश्रम शाळा स्थलांतराबाबत

**(१) ११४१८ (१९-११-२०२१) श्री.सुरेश धस** : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा व ते समाजाच्या मुख्य प्रवाहात यावेत यासाठी शासनाने सन १९५२-१९५३ पासून राज्यात प्राथमिक आश्रम शाळा सुरु केल्या, असून दिनांक २४ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयान्वये शाळा स्थलांतराबाबत पन्नास किलोमीटर असे अंतर निश्चित केले. तसेच दिनांक २३ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये तेच अंतर १० कि.मी. च्या वर केले असतानाही काही आश्रमशाळांकडून भारतीय संविधानातील अनुच्छेद ४६ चे व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिनियम २००९ व अधिनियम २०११ नुसार १० कि.मी. पर्यंतच्या अंतरातील ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे बंधनकारक असूनही दिनांक १४ जून, २०२१ पर्यंत पिंपळखुटा (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे सुरु असतानाही सदर आश्रमशाळा

४०० कि.मी. वर श्रीराम विजाभज प्राथमिक आश्रमशाळा इटकळ (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे सुरु करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान, समायोजन व विद्यार्थ्यांचा यु-डायस क्रमांक माहित नसणे त्यामुळे विद्यार्थ्यांना सर्व सोई-सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शाळा स्थलांतराबाबत गावकऱ्यांच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर शाळेवर प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग, लातूर, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, उस्मानाबाद यांनी तात्पुरती स्थगिती आदेश क्र.२०१९ विजाभज २, दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ च्या पत्रानुसार दिले असून सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, यवतमाळ व उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग, अमरावती यांनी सदर पत्र दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, यवतमाळ व उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग, अमरावती, सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग, उस्मानाबद, उपायुक्त समाजकल्याण, लातूर, संचालक विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे व संबंधित मंत्रालयीन सचिव यांची म.ना.से नियम १९७९ कलम २३ व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ कलम ५/१,२,३,५,६ नुसार शिस्तभंगाची व विभागीय चौकशीची कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ च्या स्थगिती आदेशासंदर्भात विभागीय चौकशीच्या अनुषंगाने कारवाईनुसार कृती अहवाल प्राप्त झाला आहे काय, असल्यास संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०८-१२-२०२१) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५/०३/२०१९ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिनांक २३/०७/२०१९ अन्वये राज्यातील बंद पडलेल्या, मान्यता रद्द केलेल्या तसेच सद्य:स्थितीत चालू असलेल्या विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांचे स्थलांतर करताना मूळ ठिकाणापासून स्थलांतरित ठिकाण यामधील अंतर १० कि.मी. पेक्षा अधिक असणार नाही, अशी तरतूद आहे.

तथापि, शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिनांक २४/०४/२०१८ मध्ये "अपवादात्मक परिस्थितीत प्रकरणपरत्वे निकड व आवश्यकता विचारात घेऊन गुणवत्तेनुसार अटी व शर्ती शिथिल करण्याचे अंतिम अधिकार शासनास राहतील" असे नमूद आहे.

(२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिनांक २४/०४/२०१८ मधील तरतुदीनुसार स्थलांतराबाबतची कारणे योग्य वाटत असल्यास तसेच विद्यार्थी हिताचे असल्यास शासनास स्थलांतरासाठी परवानगी देता येते. त्यानुषंगाने सोयी-सुविधांअभावी महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद द्वारा संचलित श्रीराम विजाभज प्राथमिक आश्रमशाळा ही मु. पो. इटकळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे स्थलांतरित करणेबाबतचे आदेश शासन मान्यतेने दिनांक १५/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

आश्रमशाळा स्थलांतरित झाल्याने विद्यार्थ्यांचे योग्य प्रकारे समायोजन, त्यांचा यु-डायस क्रमांक व शाळा स्थलांतरणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिकदृष्ट्या नुकसान होऊ नये, याबाबत योग्य ती कार्यवाही करून अहवाल तात्काळ सादर करणेबाबत शासन स्तरावरून क्षेत्रिय कार्यालयास निर्देश देण्यात आले असून स्थलांतर्गत १०२ विद्यार्थ्यांचे समायोजन झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

शाळा स्थलांतराबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती पडताळणी करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोट तालुक्यातील (जिअकोला) ७१ बाधित गावे तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीच्या यादीतून वगळण्यांत आल्याबाबत

**(२) ११४२६ (१९-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १५ मे, २०२१ ते १८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे त झालेल्या पावसाचा तसेच वादळी वाऱ्याचा अकोला जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना फटका बसला असून आयुक्तालयाच्या अहवालानुसार अकोट तालुक्यातील ७१ गावे बाधित दाखवण्यांत आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची दखल प्रशासन व प्रसारमाध्यमे यांनी घेतली असून त्यात तालुक्यातील संत्रा, केळी, लिंबू यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले मात्र महसूल व कृषी विभागाच्या अहवालानुसार अकोट (जि.अकोला) तालुक्यातील ७१ गावांचे वादळामुळे नुकसान झालेले नसून परिणामी अकोला जिल्ह्यातील अनेक तालुके मदतीपासून वगळले गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोट (जि.अकोला) तालुक्यातील ७१ गावांतील बाधित शेतकऱ्यांना तौक्ते चक्रीवादळापासून झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने मिळावी याद्दष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१६-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे,

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांच्या संयुक्त स्वाक्षरीच्या अंतिम अहवालानुसार तौक्ते चक्रीवादळामुळे अकोट तालुक्यामध्ये नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) तौक्ते चक्रीवादळामुळे अकोला व बार्शिटाकळी तालुक्यातील ४९.८ हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना रुपये २०.६० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली औद्योगिक वसाहती परिसरात औद्योगिक सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(३) ११४४१ (१९-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली एमआयडीसी अंतर्गातील ११.२० कि.मी. रस्त्यांची दुर्दशा झाली असून सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता ५०% प्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व ५० टक्के भार डोंबिवली एमआयडीसीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, परंतु, डोंबिवली एमआयडीसी सदरचा ५०% चा खर्च उद्योजकांकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी मधील उद्योगांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी एमआयडीसीची असताना एमआयडीसी आपली जबाबदारी पार पाडत नसल्याचा आरोप उद्योजकांनी केला असून सदरहू रस्त्यासाठी येणाऱ्या ५५ कोटीचा खर्च वसूल करताना उद्योजकांकडून प्रति चौरस २५ प्रमाणे १७ वर्षे वसुली केली जाणार असून उक्त खर्च उद्योजकांकडून वसूल करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डोंबिवली एमआयडीसी परिसरातील उद्योगांना मूलभूत सुविधा उपलब्ध कल्याण डोंबिवली महानगरपालिका व एमआयडीसी प्रशासनाने समन्वय साधून डोंबिवली औद्योगिक वसाहती परिसरात औद्योगिक सुविधा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२१-१२-२०२१) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील ३४.७६ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी औद्योगिक क्षेत्रातील ११.२० कि.मी लांबीचे रस्ते म.औ.वि. महामंडळामार्फत करण्याचे ठरले. म.औ.वि. महामंडळामार्फत करावयाच्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामासाठी रुपये ५५.८३ कोटी (निव्वळ) ची तरतूद करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) शासनाच्या धोरणानुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व दिवाबत्ती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस १९८७ नंतर हस्तांतरीत केले आहे. सन-२००२ च्या शासन निर्णयानुसार या महानगरपालिका क्षेत्र हद्दीतील मौजे. आजदे, गोळीवली, सागाव व सोनारपाडा ही डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली

होती. त्यामुळे महानगरपालिकेने देखभाल दुरुस्ती करणे बंद केले. त्यानंतर शासन स्तरावर घेतलेल्या निर्णयानुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक नगरी स्थापन होईपर्यंत म.औ.वि. महामंडळ सेवाकर आकारुन देखभाल करण्याचे ठरले. तेव्हापासून म.औ.वि. महामंडळ सेवाकर नोव्हेंबर-२००४ पर्यंत आकारत होती. त्यानंतर उद्योजकांच्या संघटनेने २००५ मध्ये सेवाकर आकारुन कामे करण्याची म.औ.वि.महामंडळास विनंती प्राप्त झाली. त्याप्रमाणे म.औ.वि. महामंडळाने सन २००७ मध्ये रुपये ४१.४७ कोटी इतका खर्च सदर कामावर करुन मार्च २०२१ पर्यंत रुपये ६/- प्रती चौ.मी.दराने रुपये ११.३३ कोटी जमा केले आहेत. दरम्यान जुलै, २०१५ मध्ये पुन्हा ही गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्र हद्दीत समाविष्ट करण्यात आली. शासन स्तरावर दिनांक ०२/०३/२०२० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार औद्योगिक क्षेत्रातील ११.२० कि.मी. रस्ते म.औ.वि. महामंडळाने दुरुस्त करण्याचे ठरले. त्याप्रमाणे म.औ.वि. महामंडळाने सदर रस्त्याचे काँक्रीटीकरणाकरीता रुपये ५५.८३ कोटी (निव्वळ) इतक्या खर्चाच्या रक्कमेस टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्राच्या धर्तीवर सेवाशुल्क आकारण्याच्या अटीस अधीन राहून प्रशासकीय मान्यता दिनांक १५/११/२०२१ रोजी प्रदान केली आहे.

---

## आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(४) ११४५७ (१९-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मुद्दयांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असली तरीही आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची खंत या भागातील पालक, विद्यार्थी तसेच सामाजिक संस्थाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली असून शासनाने शाळा सुरू करण्याचा निर्णय घेताना आश्रमशाळा, निवासीशाळांचा विचार केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटसह राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अनुदानित स्वयंसेवी संस्था संचालित शासकीय व अशासकीय आश्रमशाळांची संख्या ५५६ इतकी आहे,तर आदिवासी विकास विभागाच्या शासनमान्य ५४६ आश्रमशाळा असून या आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सन २०१८-२०१९ च्या एका अहवालानुसार एकूण २,४८,७७९ एवढी असून या शाळा माहे फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यादरम्यानपासून बंद असून कोरोना काळात राज्य शासनाने ऑनलाईन शिक्षण देण्याचा निर्णय घेतला असता राज्याच्या आदिवासी भागांमध्ये बहुसंख्य ठिकाणी मोबाईलची रेंज पोहचत नसल्याने तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना मोबाईल घेणे आर्थिकदृष्टया आवाक्याबाहेर असल्याने ऑनलाईन शिक्षणाच्या वेळीही या आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी भागातील आश्रमशाळा तसेच निवासी शाळांमध्ये शिक्षण घेणारी आदिवासी मुले शिक्षणाचा हक्क असतानाही वंचित राहिल्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या ‘शिक्षण हक्क’ या कलमाच्या अधिन राहून शिक्षणाच्या संदर्भात समान सामाजिक स्तरावर आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती धोरणात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-१२-२०२१) :** (१) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २६/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय, अनुदानित आश्रमशाळा व एकलव्य निवासी शाळेतील इ.८ वी इ.१२ वीचे वर्ग दिनांक ०२/०८/२०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये इ.५ वी ते इ. ७ वीचे वर्ग दिनांक ०४/१०/२०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात ५०० शासकीय आश्रमशाळेत १,९३,३०७ विद्यार्थी व ५५६ अनुदानित आश्रमशाळेत २,४९,०८९ विद्यार्थी असे एकूण ४,४२,३९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

आदिवासी विकास विभागाने दिनांक ०९/१०/२०२० अन्वये अनलॉक लर्निंग व दिनांक २४/०५/२०२१ अन्वये शिक्षण “सेतू अभियान उपक्रम” तसेच शालेय शिक्षण विभागामार्फत सुरु असलेला सेतू अभ्यास हा उपक्रम देखील कोविड-१९ च्या सुचनांचा अवलंब करुन राबविलेला असून उक्त उपक्रमांतर्गत आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकांनी नियोजनानूसार आश्रमशाळा कार्यक्षेत्रातील गावात जाऊन वाडी, वस्ती मधील मुला-मुलींचा गट करुन देऊळ, समाजमंदिर, अंगणवाडीची वर्ग खोली किंवा जि.प.शाळेची वर्ग खोली इत्यादी ठिकाणी उपलब्ध असलेल्या जागेत विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम केले आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.

---

## राज्यात जात पडताळणी समित्यांवर अध्यक्षाची नियुक्ती करण्याबाबत

**(५) ११५४१ (२०-११-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थित असलेल्या ७० % जात पडताळणी समित्यांवर अध्यक्षांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागातील ७ पैकी ६ जिल्हा जात पडताळणी समित्या अध्यक्षाविना सुरू असून सदर जात पडताळणी समितीचा कार्यभार एकाच अध्यक्षांकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जात पडताळणी समित्यांवर अध्यक्षांची नियुक्ती केली नसल्याने मागासवर्गीय जनतेच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या पडताळणीला उशीर होत असून जात पडताळणीसाठी आलेले हजारो अर्ज प्रलंबित राहतात हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समित्यांमधील जात वैधता प्रमाणपत्राच्या पडताळणीचे अर्ज विनाविलंब निकालात काढण्याच्या जावे दृष्टीने नागपूरसह बहुतांश जात पडताळणी समितीवरील रिक्त असलेल्या अध्यक्ष ह्या पदावर अध्यक्षांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०६-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत:खरे आहे
(२) हे खरे नाही.

श्री.सचिन कलंत्रे, यांच्याकडे जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, चंद्रपूर समितीचे अध्यक्ष म्हणून नियमित कार्यभार आहे. तसेच त्यांच्याकडे जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदीया, गडचिरोली व नागपूर या तीन समित्यांचे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच श्री.माधव कुसेकर यांच्याकडे वर्धा व भंडारा या समित्यांचे अध्यक्ष म्हणून अतिरिक्त कार्यभार आहे. त्याप्रमाणे समितीचे कामकाज सुरळितपणे सुरु आहे. कोणत्याही अर्जदाराची गैरसोय होत नाही.
(३) हे खरे नाही.

राज्यातील जिल्हा समित्यांचे अध्यक्ष १५, उपायुक्त २६ व सदस्य सचिव २१ कार्यरत आहेत. जेथे पदे रिक्त असतील तेथे अतिरिक्त कार्यभार देऊन समितीचे कामकाज सुरळीत चालू आहे.
(४) राज्यातील जिल्हा समित्यांचे अध्यक्ष १५ कार्यरत आहेत जेथे पदे रिक्त असतील तेथे अतिरिक्त कार्यभार देऊन समितीचे कामकाज सुरळीत चालू आहे. रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत अनुदानित आश्रम शाळेतील शिक्षकाचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(६) ११५८६ (०७-१२-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत १४ अनुदानित आश्रम शाळेतील ४५० शिक्षकांना गत तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधीत शिक्षकांचे वेतन तातडीने मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, नागपुर अंतर्गत १७ अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे जुन-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ या कालावधीचे वेतन विलंबाने झाले हे खरे आहे.

जून, २०२१ मध्ये प्रकल्प अधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याने तसेच जुलै-२०२१ व ऑगस्ट-२०२१ च्या वेतन देयकास कोषागार कार्यालयाकडुन त्रुटी दर्शविल्याने व या त्रुटींची पुर्तता करुन देयके कोषागार कार्यालयास फेरसादर करण्यासाठी काही कालावधी लागल्याने या वेतनास विलंब झालेला आहे. तथापि, माहे ऑक्टोबर, २०२१ अखेरचे वेतन अदा करण्यात आले असून, अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विहित वेळेत करण्याबाबत संबंधितांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील जातपडताळणी विभागातील अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७) ११६०३ (०३-१२-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जातपडताळणी विभागातील तत्कालिन उपायुक्त यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये तत्कालिन सहाय्यक आयुक्त, अकोला यांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात त्यांच्यावर गुन्हा दाखल करून निलंबित करण्याचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन बुलढाणा येथील सहाय्यक आयुक्त यांनी दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेच्या जमीन खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याने तत्कालिन अतिरिक्त आयुक्त यांनी चौकशी केली तसेच रमाबाई घरकुल योजनेच्या पाट्या मध्येदेखील लाखोंचा गैरव्यवहार झाला असून उक्त सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२४-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कार्यवाही सुरू आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जांभुळपाडा (ता.सुधागड,जि.रायगड) महापुरात उध्दवस्त झालेल्या ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(८) ११६५० (१९-११-२०२१) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९८९ च्या जांभुळपाडा (ता.सुधागड, जि.रायगड) येथे आलेल्या महापुरात गांव पूर्णत: उध्वस्त झाल्यामुळे तेथील ग्रामस्थांना शासनाने स्थलांतरीत करुन दिलेल्या पर्यायी जागेत गत ३२ वर्षापासून ग्रामस्थ तेथे राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांना पर्यायी दिलेल्या जागेत देखील मोठमोठ्या धस-दरडी असून त्या धोकादायक असल्यामुळे तहसिलदार, सुधागड यांच्याकडून या ग्रामस्थांना दरवर्षी स्थलांतरित करण्याच्या नोटीसा पाठविण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामस्थांनी सध्या राहत असलेल्या ठिकाणी घरांच्या सभोवताली संरक्षण भिंत बांधून देण्याची आग्रही मागणी केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामस्थांनी त्यांनी केलेल्या मागणीनुसार सदर ग्रामस्थांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेच्या व संरक्षणाचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) संरक्षक भिंत बांधणेचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) शहरात आलेल्या पुरामध्ये व्यापाऱ्यांना विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(९) ११६५१ (१९-११-२०२१) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड शहरातील (जि.रायगड) सुमारे ३५०० व्यापाऱ्यांचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या महापुरामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना विमा कंपन्याकडून नुकसान भरपाई मिळण्याबाबत मा.पालकमंत्री, जिल्हा-रायगड, मा.खासदार, मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत विमा कंपन्याचे अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्यक्षात नुकसान भरपाई देताना विमा कंपन्याकडून विमा दाव्याच्या रक्कमेत २५ टक्के ते ४० टक्के कपात करुन व्यापाऱ्यांना उर्वरित रक्कम देण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, देशातील अन्य राज्यांमध्ये व शहरांमध्ये विमा दाव्यांच्या रकमेत कपात (हेअरकट) करण्यात येत नसतानाही महाराष्ट्रात मात्र पंचनाम्याच्या नावाखाली व्यापाऱ्यांची विमा कंपन्यांकडून अडवणूक करण्यात येत असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना नुकसानीची पूर्णत: रक्कम मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१६-१२-२०२१)** : (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) खरे नाही.
(४) व (५) खरे नाही.

जिल्हाधिकारी कार्यालयात मा.खासदार श्री.सुनिल तटकरे यांच्यासोबत दिनांक २३/०९/२०२१ व दिनांक २७/१०/२०२१ रोजी महाड तालुक्यातील विमा दाव्यांबाबतची आढावा बैठक घेण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार निकाली काढलेले दावे व प्रलंबित दावे यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| कंपनीचे नाव | न्यू इंडीया इन्शुरन्स कं. लि. | फयुचर जनरल लि. | ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी | एस.बी.आय. जनरल लि. |
|---|---|---|---|---|
| दाखल दावे | ८०७ | २०० | २३७ | १९ |
| निकाली दावे | ५०५ | १८४ | १४१ १ | ६ |
| प्रलंबित दावे | ३८६ | १३ | ६९ | - |
| नाकारलेले दावे | - | - | - | ३ |

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय इमारती व राज्यमार्ग तसेच अन्य रस्त्यांची चक्रीवादळामुळे झालेली दुरवस्था दुर करण्याकरीता निधीची तरतूद करण्याबाबत

**(१०) ११६६१ (१९-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड व दापोली ही दोन तालुके सन २०२०-२०२१ मध्ये वा त्या सुमारास उद्भवलेल्या निसर्ग चक्रीवादळाने उद्ध्वस्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून मदतीपोटी रुपये २०२ कोटी ९५ लाखाचा निधी रत्नागिरी जिल्ह्याला प्राप्त झाला असून शासकीय इमारतींसह रस्ते दुरुस्ती निधी उपलब्ध झाला नसल्याने इमारत व रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्ह्यातील बाधित शासकीय इमारती व राज्यमार्ग तसेच अन्य रस्त्यांची दुरवस्था दुर करण्याकरीता शासनामार्फत निधीची तरतूद करावी याद‍ृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) निसर्ग चक्रीवादळाने बाधित विविध क्षेत्रासाठी रत्नागिरी जिल्ह्याला रुपये २०४.८६ कोटी एवढी मदत देण्यात आली आहे. उर्वरित बाधित क्षेत्रासाठी मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.

---

## अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्याशर्ती) नियमावलीतील बदलीबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(११) १२१३६ (०१-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके,**

**श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्याशर्ती) नियमावली १९८१ मधील तरतूदीच्या अधिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमावलीतील तरतूदीनुसार देय असलेले आर्थिक व अन्य लाभ सदरहू शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संयुक्त सेवाजेष्ठता यादी खाजगी शाळा व्यवस्थापनाद्वारे तयार केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विनाअनुदानित तत्वावरील शाळांमधून अनुदानित तत्वावरील शाळेतील पदावर बदलीबाबत निर्गमित केलेला शासन निर्णय दिनांक २८ जून, २०१६ रोजीच्या नियमावली १९८१ मधील बदलीबाबतच्या तरतूदींचे उल्लंघन करणारा आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमावलीतील बदलीबाबतच्या तरतूदींचे उल्लंघन करणारा शासन निर्णय असंवैधानिक असल्यामुळे सदरहू शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (२२-०३-२०२२) :** (१) अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित तत्वावरील शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतूदींच्या अधीन आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) मा.उच्च न्यायालयाने विविध आदेशांत दिनांक २८/०६/२०१६ च्या शासन निर्णयातील वेतनाबाबतची तरतूद महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतूदींशी विसंगत

ठरविल्याने सदर शासन निर्णय अधिक्रमित करून दिनांक ०८/०६/२०२० ची अधिसूचना व त्यानुषंगाने दिनांक ०१/०४/२०२१ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

## नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील वर्धा नदीवर मोवाड व खैरगाव येथे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१२) १३०७४ (०१-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील वर्धा नदीवर मोवाड व खैरगाव येथे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या बांधकामाला तडे गेले असल्याने पाणी वाहून जात असून जलसाठा होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचन करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१७-०३-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील वर्धा नदीवरील खैरगाव येथील बंधाऱ्याचे काम जलसंपदा विभागामार्फत सन २००५ मध्ये पूर्ण झाले असून, सदर काम सुयोग्य दर्जाचे झालेले आहे.

तसेच, नरखेड तालुक्यातील वर्धा नदीवरील मोवाड येथील बंधारा मृद व जलसंधारण विभागामार्फत सन, २०१४ मध्ये बांधण्यात आला असून सदर बंधारा सुस्थितीत व मजबूत आहे असे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांनी कळविले आहे.

(२) नाही, हे खरे नाही. बंधाऱ्याच्या बांधकामाला तडे गेलेले नाही.

तथापि, मृद व जलसंधारण विभागाकडील मोवाड बंधाऱ्याच्या गेटचे रबरसील खराब झाल्याने अत्यल्प प्रमाणात गळती होत असल्याचे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांनी कळविले आहे. तसेच या बंधाऱ्यामुळे पाणी अडून जमिनीच्या पाणी पातळीत वाढ होऊन जलसंधारणाचा उद्देश सफल होत असून शेतकरी पंपाद्वारे पाणी उपसा करुन प्रत्यक्ष सिंचन करीत आहे, असे देखील जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, मृद व जलसंधारण विभागाकडील मोवाड बंधाऱ्याचे ७७ गेटचे रबरसील बदलणे व बंधाऱ्याच्या नदी काठाजवळील भरावाची दुरुस्ती करण्याचे नियोजित असल्याचे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिरसम बु.(ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) १३२२४ (०२-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसम बु. (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील १६ वर्षापासून आरोग्य सहाय्यकासह इतर ६ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सिरसम बु. येथील प्राथमिक रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामविकास विभागाच्या दिनांक २०/०८/२०२१ व दिनांक ०१/०९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद आरोग्य विभागातील गट क संवर्गाची औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सहायक (पु.) आरोग्य सहाय्यक (स्त्री) या संवर्गातील पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पन्हाळेकाजी ते दाभीळ तसेच पांगारी-गोविंदशेत-उन्हवरे येथील रस्त्यांचे काम अपूर्णावस्थेत व निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(१४) १३३५५ (०१-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पन्हाळेकाजी ते दाभीळ तसेच पांगारी-गोविंदशेत-उन्हवरे येथील ५.७०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे काम सन २०१९ मध्ये सुरू करण्यात आले असून तीन वर्ष होवूनही काम अपूर्णावस्थेत असून झालेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची कामे प्रलंबित राहण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच, आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामावर एकूण किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (११-०३-२०२२) :** (१) सदर रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कोरोना महामारी, पावसाळ्याचा अधिक कालावधी तसेच कामातील वावामधील बदल इत्यादी कारणांमुळे कामास विलंब झाला आहे. सदर कामावर आतापर्यंत रुपये ३२९.३६ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. सदर कामाची राज्य गुणवत्ता निरीक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून वेळोवेळी तपासणी करण्यात आली असून या अनुषंगाने सदर रस्त्याचे उर्वरित काम मानकाप्रमाणे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## होनाड (ता.खालापूर, जि.रायगड) येथील जयसिंग अलॉय कारखान्यात चिमणी कोसळल्याने एका कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(१५) १३४४२ (०१-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होनाड (ता.खालापूर, जि.रायगड) येथील जयसिंग अलॉय कारखान्यात चिमणी कोसळल्याने एका कामगाराचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी या कारखान्यात ५ कामगारांचा बळी व १० पेक्षा अधिक कामगार गंभीर जखमी झाले असून कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खालापूर तालुक्याच्या हद्दीत सध्या सुरू असलेल्या कारखान्यांची संख्या २८६ असून येथील कामगार वर्ग असुरक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कारखान्यांना नोटीसा बजावून सुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

मे.जयसिंग अलॉय प्रा. लि, सर्वे नं ६/२, ७/१, २A/७/८ होनाड गांव, ताकाई अडोशी रोड, ता.खालापूर, जि.रायगड या कारखान्यात दिनांक २७/०१/२०२२ रोजी सकाळी ९ वा. च्या सुमारास कारखान्यातील चिमणीचा एक तृतीयांश भाग तुटून तेथे काम करीत असलेल्या कामगारांच्या अंगावर कोसळला, त्यात एका कामगाराचा मृत्यू झाला असून दोन कामगार जखमी झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

गतवर्षी सन २०२१ मध्ये या कारखान्यामध्ये कोणताही अपघात झालेला नाही. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे असे म्हणता येणार नाही.

(३) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड या कार्यालयाकडे कारखाने अधिनियम, १९४८ अन्वये खालापूर तालुक्यातील ३६१ कारखाने नोंदणीकृत आहेत.

कारखान्यातील अपघाताचा परिणाम व व्याप्ती त्याच कारखान्याच्या परिसरापुरती मर्यादित असल्याने कामगार वर्ग असुरक्षित आहे असे म्हणता येणार नाही.

(४) सदर घटनेची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी दरम्यान कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ च्या नियम भंगाबाबत सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी रायगड, अलिबाग यांच्या न्यायालयात दोन फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत केंद्रीय निरीक्षण प्रणालीमार्फत कारखान्यांचे निरीक्षण औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून केले जात असून सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना सुचविल्या जातात. तसेच कायदेभंग आढळल्यास व त्याची पुर्तता न झाल्यास संबंधित कारखान्याविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाते.

कारखान्यातील कामगारांसाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या पुढाकाराने वेळोवेळी सुरक्षेविषयक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे कारखान्यात काही आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यास हाताळण्यासाठी कारखान्यांमध्ये रंगीत तालिम (Mock drill) आयोजीत केली जाते.

कारखान्यांत भविष्यात अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता उपाययोजना सुचवून त्यांची कारखाना व्यवस्थापनाकडून पुर्तता करुन घेण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

---

## इन्सुली (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील कालव्याचे काम पूर्ण करुन कालवा सुरु करण्याबाबत

**(१६) १३४५१ (०१-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इन्सुली (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावातून तिलारी आंतरराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून धरणाचे पाणी प्रवाहीत करणारा कालवा १० वर्षापासून बंद असून कालव्याचे काम पूर्ण करण्यासाठी मा.जलसंपदा मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, तिलारी पाटबंधारे प्रकल्प यांच्याकडे भेटून लेखी निवेदन देवून कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे सरपंच, इन्सुली ग्रामपंचायत व स्थानिक ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तिलारी कालवा बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कालव्याचे काम प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने तिलारी आंतरराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून धरणाचे पाणी प्रवाहीत करणारा कालव्याचे काम पूर्ण करुन कालवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१६-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कि.मी. ३० मधील सा.क्र. २९/००० मी. सा.क्र. २९/१६० मी. मधील क्षेत्र कठिणस्तर खडकातील असल्याने व हे क्षेत्र घरांच्या शेजारी असल्याने येथील कामे ग्रामस्थांच्या विरोधामुळे नियोजनाप्रमाणे पूर्ण होऊ शकली नाहीत.

सदर कामाची कंत्राटदाराने प्रगती न दर्शविले बाबत धरणे आंदोलन करणेत आले होते. तथापि, आजमितीस कठिणस्तर खडकातील खोदाई पूर्ण झाली असून सदर काम तातडीने करणेत येत असल्यामुळे आंदोलनास स्थगिती देण्यात आलेली आहे.

(२) तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बांदा शाखा कालवा एकूण लांबी ५७ कि.मी. यापैकी कि.मी. १ ते ४४ मधील मातीकामे व बांधकामे ही कि.मी. ३० मधील १६० मी. चे कठिणस्तर खडकातील खोदकाम, १ गावरस्ता पूल व ५०० मी. अस्तरीकरण वगळता सन-२०१९ मध्ये पूर्ण झालेली आहेत. यापैकी मौजे इन्सुली, ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग या गावातील लांबी कि.मी. ३१ ते कि.मी. ३५ आहे. कि.मी. ३० ची संरेखा ही मौजे ओटवणे गांवठाणातून जात असून सा.क्र. २९/००० मी. सा.क्र. २९/१६० मी. मधील क्षेत्र कठिणस्तर खडकातील असल्याने व हे क्षेत्र घरांच्या शेजारी असल्याने येथील कामे ग्रामस्थांच्या विरोधामुळे पूर्ण होऊ शकली नाहीत.

(३) कि.मी. ३० मधील खोदकाम पूर्ण झाले असून कालवा अस्तरीकरण व अन्य बांधकामे यांचे काम माहे एप्रिल, २०२२ अखेर पूर्ण करुन सदर लांबीत पाणी प्रवाहीत करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील आशा सेविकांना देय असलेले मानधन थकबाकीसह अदा करण्याबाबत

**(१७) १३४५३ (०२-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील आशा सेविकांना केंद्र शासनाच्या निर्णयानुसार माहे ऑक्टोबर, २०२१ पासून प्रोत्साहन भत्ता देण्यात आला नसून चार महिन्याचे मानधन मिळालेले नसल्यामुळे त्यांच्या कुंटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविडच्या कामासाठी केंद्र शासनाकडून मिळणारा रूपये १ हजार मानधन भत्ता माहे ऑक्टोबर, २०२१ पासून बंद करण्यात आला असून तो पूर्ववत करुन आशा सेविकांना रुपये १ हजार व गटप्रवर्तकांना रूपये ५०० देण्यात यावे असे केंद्र शासनाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १७ जुलै, २०२० रोजीपासून आशा सेविकांना रुपये २ हजार तर गटप्रवर्तकांना रूपये ३ हजार मोबदल्यात वाढ केली असून रत्नागिरी जिल्ह्यातील आशा सेविकांना सदर मोबदला दिला नसल्यामुळे आशा सेविका यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, आशा सेविकांना देय असलेले मानधन अदा करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने आशा सेविकांना देय असलेले मानधन थकबाकीसह अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-०३-२०२२)** : (१) केंद्र शासनाच्या सुचनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील कोविड लशीकरणासंबंधी हर घर दस्तक अंतर्गत काम केलेल्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना माहे ऑक्टोबर, २०२१ ते माहे मार्च, २०२२ या कालावधीतील दरमहा अनुक्रमे रुपये १०००/- व रुपये ५००/- याप्रमाणे मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०६/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत, ही बाब खरी आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) रत्नागिरी जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना दिनांक १७ जुलै, २०२० च्या शासन निर्णयानुसार माहे एप्रिल, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ पर्यंत रुपये २४६.९० लक्ष इतका राज्य शासनाचा मोबदला अदा करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०७/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना माहे नोव्हेंबर, २०२१ ते माहे मार्च, २०२२ या कालावधीतील जुन्या दराने व दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयानुसार मान्य केलेल्या जुलै, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीतील वाढीव मानधन अदा करण्यास मान्यता दिली आहे. सदर मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा रुग्णालय, अलिबाग (जि.रायगड) येथे जीएनएम प्रशिक्षणामध्ये उत्तीर्ण झालेल्या १७ अधिपरिचारीकांना नियुक्तीचे आदेश देण्याबाबत

**(१८) १३४६६ (०२-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा रुग्णालय, अलिबाग (जि.रायगड) येथे सन २०१९-२० मध्ये जीएनएम प्रशिक्षणामध्ये उत्तीर्ण झालेल्या १७ बंधपात्र अधिपरिचारीकांनी १८ महिन्यांचे नियुक्ती आदेश मिळण्याबाबत आरोग्य अधिकारी यांना अर्ज करुनही नियुक्तीचे आदेश मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात रुग्णांची सेवा करणाऱ्या १७ अधिपरिचारीकांचे प्रशिक्षण पूर्ण होवून १२ महिन्यांचा कालावधी होऊनही नियुक्तीचे आदेश न मिळाल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी हल्लाबोल धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिपरिचारीकांना नियुक्तीचे आदेश न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर १७ अधिपरिचारीकांना नियुक्तीचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०३-२०२२) :** (१) शासकीय परिचारीका महाविद्यालयात प्रशिक्षण घेवून उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थीकडून त्यांचेच नावे रुपये २५००/- नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट यास्वरूपात बंधपत्र घेण्यात येत होते. सदर बंधपत्र हे त्यांना देण्यात येणारे मोफत शिक्षण व त्यांनी शासनाच्या आवश्यकतेनुसार शासकीय आरोग्य संस्थांमध्ये दयावयाची सेवा याअनुषंगाने होते. सदर बंधपत्र हे शासकीय सेवेची हमी नव्हती. तसेच, सन २०१९-२०२० पासून बंधपत्र घेण्याचे बंद करण्यात आले आहे. बंधपत्रित हे संबोधनही रद्द करण्यात आले आहे. यास्तव सन २०१९-२० मधे जीएनएम प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या अधिपरिचारीकांना १८ महिन्यांचे नियुक्ती आदेश देणे शासनावर बंधनकार नाही. तथापि, शासनाच्या निकडीनुसार या अधिपरिचारीकांना दिनांक २१/०२/२०२२ रोजी कंत्राटीतत्वावर ६ महिन्यासाठी नियुक्ती आदेश दिलेले आहे. परंतु संबंधित अधिपरिचारीकांनी अद्याप नियुक्ती आदेश स्वीकारलेले नाही.
(२) संबंधित अधिपरिचारीकांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी आंदोलन केले ही बाब खरी आहे.
(३) बंधपत्र हे संबंधित अधिपरिचारिकांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या अनुषंगाने असल्याने सदर बंधपत्र हे शासन सेवेची हमी स्वरुपात नाही. यास्तव हे खरे नाही.
(४) प्राप्त अर्जानुसार एकूण १५ उमेदवारांचे ६ महिने कंत्राटी नियुक्तीचे आदेश उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे यांनी दिनांक २१/०२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर आदेश उमेदवारांनी अद्यापही स्विकारलेले नाही. तसेच, कंत्राटी कर्मचाऱ्यांनी द्यावयाचे शपथपत्र देखील सदर उमेदवारांनी संबंधित कार्यालयाकडे दिले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलसंपदा विभागातील सहाय्यक/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तिसऱ्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१९) १३५३३ (१५-०३-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील सहाय्यक/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती प्रकरणे वेतन पडताळणी पथक/ महालेखापाल कार्यालयाकडून निकाली न काढता परत पाठविण्यात येत असल्याने सदर प्रकरणी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केले असल्याचे जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई यांनी शासन पत्र संकिर्ण-२१८/प्र.क्र/५५/२०१८/आ (तांत्रिक) दिनांक २८|०२|२०१८ अन्वये मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाच्या दिनांक १३ जानेवारी, १९८२ च्या शासन निर्णयानुसार ज्या कर्मचाऱ्यांनी शासकीय तांत्रिक संस्थेचा एक वर्षाचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा कोर्स उत्तीर्ण केला आहे अशा कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सेवेत लागल्याच्या तारखेपासून नियत अस्थायी आस्थापनेवर नेमणूका देण्यात याव्यात असा सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने शासन निर्णय काढण्यात आला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच, सहाय्यक / कनिष्ठ अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) यापदावर अनेक वर्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या पदाचा लाभ मिळण्यासाठी शासनाचे नियोजन काय आहे,

(३) असल्यास, सहाय्यक/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासन मान्यताप्राप्त संघटनेच्या मागणीनुसार मा.राज्यमंत्री जलसंपदा यांच्या समवेत दिनांक ८ व २६ ऑक्टोबर, २०२१ व १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या संयुक्त बैठकीत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर कर्मचाऱ्यांच्या बाजूने दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी निकाल दिलेला असून उक्त निर्णयाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करु नये

असे मंत्री महोदयांनी निर्देश दिलेले असतानाही जलसंपदा विभागाकडून मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंपदा शासनपत्र दिनांक १८ मार्च, १९९८ व दिनांक १८ जून, १९९८ नुसार वित्त विभागाच्या सहमतीने सदर कर्मचाऱ्यांना पहिली व दुसरी आश्वासित योजना कार्यव्ययी आस्थापनेची सेवा धरून देण्यात आलेली असून २४ वर्षांनंतर दिनांक १९ मे, २०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने तिसरी आश्वासित योजनेचा लाभ देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील सहाय्यक / कनिष्ठ अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) या पदावर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तिसऱ्या आश्वासित योजनेचा लाभ मिळण्याबाबत तसेच त्यांच्या वेतन पडताळणीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१७-०३-२०२२) :** (१) होय.

(२) होय. शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, दिनांक १३ जानेवारी, १९८२ अन्वये, ज्या उमेदवारांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांचा पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे आणि ज्या तांत्रिक सहायक म्हणून कार्यव्ययी आस्थापनेवर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली आहे. अशा उमेदवारांना पाटबंधारे विभागातील तांत्रिक सहायकाच्या पदावर नियमित आस्थापनेवर तात्पुरती नियुक्ती द्यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यात आले आहे. मात्र सामान्य प्रशासन विभागाने सदर प्रकरणी स्वयंस्पष्ट अभिप्राय दिलेले नाहीत. सबब, प्रस्तूत प्रकरणी निर्णय घेण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) मूळ अर्ज क्र.२३८/२०१६ वरील दिनांक २५/०६/२०१९ रोजीचे आदेश व पुनर्विलोकन अर्ज क्र.२१/२०१९ मधील दिनांक ०८/०२/२०२१ रोजीच्या आदेशाविरूध्द शासनाच्यावतीने दाखल करण्यात आलेली रिट याचिका क्र.३११८/२०२१ मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०९/०९/२०२१ रोजीच्या

आदेशान्वये फेटाळण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०९/०९/२०२१ रोजीच्या आदेशाविरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुज्ञा याचिका (S.L.P.) दाखल करण्यास विधी व न्याय विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन पत्र, दिनांक २२/११/२०२१ अन्वये, अधीक्षक अभियंता, आधार सामग्री संकलन नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक यांना मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) होय. शासन पत्र, दिनांक १९/०५/२०१४ च्या पत्राच्या विरोधात जलसंपदा विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक संघटनेने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र.६१७/२०१४ दाखल केला होता. सदर मूळ अर्जावरील दिनांक ०२/१२/२०१५ रोजीच्या न्यायनिर्णयात जलसंपदा विभागाचे दिनांक १९/०५/२०१४ रोजीचे पत्र योग्य आहे असे म्हटले आहे. तसेच सदर न्यायनिर्णयात दिनांक १८/०३/१९९८ व दिनांक १८/०६/१९९८ ची पत्रे शासन निर्णय दिनांक ०८/०६/१९९५ व शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक ०१/११/१९९५ च्या तरतुदींशी विसंगत असल्याचे म्हटले आहे.

(५) प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुज्ञा याचिका न्यायप्रविष्ट असल्याने याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयांमधील रूग्णवाहिकेवरील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व भत्ता मिळण्याबाबत

**(२०) १३५६७ (१५-०३-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रायगड जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयामध्ये १०८ नंबरची रूग्णवाहिका ग्रामीण भागातील खेडोपाडी, आदिवासी वाड्या व दुर्गम भागात कार्य देणारी सेवा असून कोरोना काळात या रूग्णवाहिकेने कोरोना रुग्णांचे

ने-आण करणे, रुग्णांना आरटीपीसीआर साठी घेऊन जाणे, औषध आणणे, कोरोना व्हॅक्सीन व ऑक्सिजन आणणे अशी महत्वाची सेवा दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णवाहिकेवरील सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहे सप्टेंबर, २०२१ पासून ते अद्यापपर्यंत वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एशकॉम मीडिया इंडिया, प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या रूग्णवाहीकेवरील वाहकांना पगार व भत्ता अद्याप देण्यात आला नसून सदर कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला रूपये ८,९९३/- एवढा असून तो वेळेवर न मिळाल्याने त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये सेवा देणाऱ्या रूग्णवाहिकेवरील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व भत्ता वेळेवर मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

टोल फ्री १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकांचे सेवापुरवठादाराचे काम मे. बी. व्ही. जी. इंडिया प्रा. लि. यांना देण्यात आलेले असून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत चे वेतन सेवापुरवठादारांकडुन देण्यात आलेले आहे.

(३) एशकॉम मीडिया इंडिया, प्रायव्हेट लिमिटेड या सेवापुरवठादारास १०२ क्रमांकाच्या वाहनचालकाच्या सेवा पुरविण्याचे काम देण्यात आलेले आहे व या सेवा पुरवठादाराने रुग्णवाहिकांचे वाहनचालकांचे माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंतचे वेतन देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुढील वेतन देण्याच्या सुचना सेवापुरवठादारास देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.